(1)


**महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग**
**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,**
डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

| | |
|---|---|
| **डॉ.मधुकर शि.पवार**<br>उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ)<br>तथा उपमुख्य निबंधक<br>(जन्म व मृत्य) महाराष्ट्र राज्य | कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०<br>मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०<br>फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२<br>ई-मेल crs_d83@yahoo.com |


**परिपत्रक क्रं.१२** जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८३/नाव समाविष्ठ/अधिसूचना/४९७६-५११२/१५
दिनांक:- २७/०७/२०१५

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु
जिल्हा परिषद ........... (सर्व) — 3

२) आरोग्य अधिकारी
तथा निबंधक जन्म-मृत्यु
महानगरपालिका ............ (सर्व)

३) कार्यकारी आरोग्य अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई

विषय :- जन्म नोंदणीत बाळाचे नाव समाविष्ट करणेबाबत...
संदर्भ :- क्रं.जमृनो-२०१४/७५/क्रं.२४/कु.क.२, दिनांक ०९/०७/२०१५,
सार्वजनिक आरोग्य विभाग, नविन मंत्रालय, मुंबई-१.

आपणास विदितच आहे की जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ ,चे कलम १४ व महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी नियम २०००, नियम क्र.१० नुसार जन्म नोंदणी मध्ये जन्म दिनांकापासून १५ वर्षा पर्यंत बाळाच्या नावाची नोंद करण्याची तरतुद आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक- १३/०५/२०१४ च्या आदेशान्वये १५ वर्षानंतर बाळाच्या नावाची नोंद जन्म नोंदणीमध्ये समाविष्ठ करण्यासाठी ५ वर्ष मुदतवाढ दिलेली आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनाने अधिसूचना क्रमांक-प्रचिनी-२०१४/प्र.क्रं.४७७/कु.क., दिनांक १५/०५/२०१५ रोजी निर्गमित केली असून, ती उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयस प्राप्त झाली आहे. त्याव्दारे ५ वर्षासाठी म्हणजेच दिनांक १४/०५/२०२० पर्यंत पाच वर्षासाठीच्या कालावधीसाठी १५ वर्षांचा कालावधी शिथिल केलेला आहे.

आपणास सूचीत करण्यात येते की, (अधिसूचनेच्या) दिनांक १५/०५/२०१५ ते १४/०५/२०२० पर्यंत या कालावधीमध्ये जास्तीत जास्त किंबहुना सर्व नागरीकांना त्यांचे नाव जन्म नोंदणीत समाविष्ठ करुन घेण्यासाठी आपल्या स्तरावरुन सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून वृत्तपत्रातून तसेच इतर माध्यमाव्दारे व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच 'नोंदणी दशक' च्या कृति

आराखडयात याचा समावेश करावा. व त्या अनुषंगाने कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी. या कालावधी मध्ये जन्म नोंदणीत नाव समाविष्ट करण्यासाठी करावयाची पध्दत :-

१) ज्या नागरिकांच्या मुलाच्या जन्माची नावाशिवाय नोंदणी १.१.२००० पूर्वी झालेली आहे व ज्यांच्या नोंदणीला १५ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे. अशा सर्व नागरिकांना या संधीचा लाभ देण्यात येत आहे या मध्ये सन १९६९ पुर्वीच्या नोंदणीचा सुध्दा समावेश आहे.

२) संबंधित व्यक्ती अथवा त्यांचे पालक यांचा बाळाचे नाव समाविष्ट करणेबाबतचा अर्ज घेण्यात यावा.

३) नावाच्या शाबीतीकरिता कुठलाही एक शासकिय पुरावा उदा. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, एस.एस.सी. प्रमाणपत्र, पॅनकार्ड, मतदार ओळखपत्र, आधार कार्ड इ. ची प्रत घेण्यात यावी.

४) बाळाचे संपूर्ण नाव लिहिण्याबाबत आग्रह धरण्यात यावा. उदा. राम नामदेव दामले.

५) बाळाचे नाव समाविष्ट झालेनंतर ते नाव बदलता येत नाही याची कल्पना नागरिकांना देण्यात यावी व तसा फलक दर्शनीय भागावर लावण्यात यावा.

६) काही धर्मांमध्ये आई-वडिल यांचे आडनावापेक्षा बाळाचे आडनाव वेगळे ठेवण्याची प्रथा असते तसेच बाळाचे मधले नाव वडिलांच्या नावा पेक्षा वेगळे असते अशा प्रकरणांत संबंधितांनकडून अर्जामध्ये तसा स्पष्ट उल्लेख नमूद करुन घेण्यात यावा.

७) बाळाचे नाव जन्म नोंदणीत समाविष्ट केले नंतर शेरा रकान्यात या परिपत्रकाचा संदर्भ, क्रमांक व दिनांक नमूद करुन निबंधक/उपनिबंधक जन्म-मृत्यु यांनी स्वाक्षरी करुन दिनांक नमूद करावा. व नावासह सुधारीत जन्म दाखला वितरीत करण्यात यावा.

८) जन्म नोंदणीत बाळाचे नाव समाविष्ठ करण्याबाबतचा अर्ज जन्म अहवाला सोबत कायमस्वरुपी जतन करण्यात यावेत.

९) नागरीकांना नांव नोंदवून घेण्यासाठी प्रवृत्त करावे.

सदरचे परिपत्रक आपले अधिनस्त सर्व निबंधक/उपनिबंधक यांना देण्यात यावेत व आपल्या कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त सर्व नागरिकांना या संधीचा लाभ मिळण्यासाठी प्रसिध्दी माध्यमांद्वारे जनजागृती करावी. दिनांक १४/०५/२०२० या तारखे नंतर हा कालावधी कुठल्याही परिस्थित वाढवून मिळणार नाही याची नोंद सर्व स्तरावर घेण्यात यावी. तसेच आपणांद्वारे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा.

सोबत - १) संदर्भिय पत्राची प्रत.
२) अधिसूचनेची मराठी व इंग्रजी प्रत.

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत माहितीस्तव सादर :-
१) मा. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
प्रत सस्नेह :-
२) उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे .......... (सर्व)
प्रत उचित कार्यवाहीस्तव :-
३) सहाय्यक संचालक, नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, (सर्व)
४) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) तथा अप्पर जिल्हा निबंधक, जन्म-मृत्यू, जिल्हा परिषद, (सर्व)
५) उपसंचालक (माहिती व जनसंपर्क) मध्यवर्ती इमारत, पुणे-१.
(व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह)

C:D-83/Circular 2015.in

( "महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी (दुसरी सुधारणा) नियम २०१५ या विषयावरील" सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्रमांक प्रचिनी २०१४/प्र.क्र.४७७/कु.क., दि.१५/०५/२०१५ ही दि. मे २८ - जून ३, २०१५ च्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली असून त्याची प्रत सोबत पृष्ठांकीत केली आहे.)

## महाराष्ट्र शासन

क्र. जमृनों २०१४/७५/.क्र.२४/कु.क २
सार्वजनिक आरोग्य विभाग,
जी.टी. हॉस्पिटल आवार, १० वा मजला
मुंबई-४०० ००१
दि. ०९/०७/२०१५.

अधिसूचनेची प्रत माहितीसाठी व योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(अ.वि.कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
सचिव, केंद्र शासन स्वास्थ व कुटुंब कल्याण मंत्रालय, (कुटुंब कल्याण विभाग) निर्माण भवन, नवी दिल्ली
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मंबई
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण) महाराष्ट्र राज्य, पुणे
सहसंचालक, आरोग्य सेवा (वैद्यकीय), मुंबई
सचिव व आयुक्त (कु.क.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
विभागीय आयुक्त, (सर्व)
सर्व जिल्हाधिकारी (त्यांच्या अखत्यारितील सर्व अधिका-यांना कळविण्याच्या विनंतीसह)
सर्व आयुक्त, महानगरपालिका (त्यांच्या अखत्यारितील सर्व अधिकाऱ्यांना कळविण्याच्या विनंतीसह)
मुख्यधिकारी, नगरपालिका/नगर पंचायत (सर्व)
उपसंचालक/सहसंचालक आरोग्य सेवा, (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (या अधिसूचनेस व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह)
व्यवस्थापक, मध्यवर्ती शासकीय मुद्रणालय, मुंबई.
निवडनस्ती, कुटुंबकल्याण

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जी. टी. रुग्णालय आवार, १० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक १५ मे २०१५

## अधिसूचना

**जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९.**

क्रमांक जमृनों. २००८/७५/प्र. क्र. २४/कु.क. २.— जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ (१९६९ चा १८) याच्या कलम ३० च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) आणि कलम १४ द्वारे प्रदान कलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन केंद्र सरकारच्या मान्यतेने महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी नियम, २००० मध्ये याद्वारे खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी (दुसरी सुधारणा) नियम, २०१५ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी नियम, २००० च्या नियम १० मधील पोट-नियम (१) च्या परंतुकामध्ये " (एक) जर त्यांची नोंदणी " या वाक्यापासून सुरू होणाऱ्या व " अधीन राहून निबंधक " या वाक्याच्या ठिकाणी संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर बदली दाखल करण्यात येईल :—

" (एक) जन्म व मृत्यू नोंदणी नियम, २००० च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी जर नोंदणी केली असेल तर महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी (दुसरी सुधारणा) नियम, २०१५ प्रसिद्ध करण्याच्या वेळी ज्या प्रकरणांना पंधरा वर्षे पूर्ण झालेली आहेत अशा प्रकरणांसाठी आणखी पाच वर्षांचा कालावधी देण्यात येईल किंवा (दोन) महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी (दुसरी सुधारणा) नियम, २०१५ च्या प्रारंभाच्या दिनांकानंतर जर नोंदणी केली असेल तर कलम २३ च्या पोट-कलम (४) च्या तरतुदींच्या अधीन राहून अशा नोंदणीच्या दिनांकापासून निबंधक ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ज्ञा. ल. सुळे,
शासनाचे उप सचिव.

(5)

## PUBLIC HEALTH DEPARTMENT

G. T. Hospital Complex Building, 10th Floor,
Mantralaya, Mumbai 400 001, dated 15th May 2015

### *NOTIFICATION*

REGISTRATION OF BIRTH AND DEATH ACT, 1969.

No. Jamruno. 2008/75/C.R. 24/F.W. 2.—In exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*2*) of section 30 read with section 14 of the Registration of Birth and Death Act, 1969 (18 of 1969), the Government of Maharashtra with the approval of Central Government, hereby makes the following rules further to amend the Maharashtra Registration of Births and Deaths Rules, 2000, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Registration of Births and Deaths, (2nd Amendment) Rules, 2015.

2. In rule 10 of the Maharashtra Registration of Births and Deaths Rules, 2000 in sub-rule (1), in the proviso, for the portion beginning with the words " which shall be reckoned " and ending with the words " the Registrar shall,-" the following shall be substituted, as follows, name :—

" which shall be reckoned,—

(I) in case where the registration has been made prior to the date of commencement of the Registration of Births and Deaths Rules, 2000, further five years period shall be given, in respect of those cases, where fifteen years period has been completed at the time of publication of the Maharashtra Registration of Births and Deaths (2nd Amendment) Rules, 2015, or

(II) in case where the registration is made after the date of commencement of the Maharashtra Registration of Births and Deaths (2nd Amendment) Rules, 2015, from the date of such registration, subject to the provisions of sub-section (*4*) of section 23, and the Registrar shall, ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. L. SUL,
Deputy Secretary to Government.